"कन्या सुकन्या कर्तव्या"

वुईमेन्स एज्युकेशन सोसायटी, सांगली

# श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

दिनांक: ०३/०९/२०२०

## ज्युनिअर, सिनिअर व पी.जी. शिष्यवृत्ती योजना

## अल्पसंख्यांक(Minority)(Post-Matric) शिष्यवृत्ती २०२०-२१

**http://www.scholarships.gov.in**

महाविद्यालयातील मुस्लिम, बौध्द, ख्रिचन, शीख, पारशी, जैन या अल्पसंख्याक समाजातील प्रवेशित विद्यार्थ्यांना **सन २०२०-२१** सालातील अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी अर्ज ऑनलाईनकरणे आवश्यक आहे. अल्पसंख्याक शिष्यवृत्तीची सवस्तिर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ तसेच इतर अनुषंगिक माहितबाबत जाहिरात संचलनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. वरील संकेत स्थळावर सविस्तर सुचना दिलेली आहेत.

**ज्या विद्यार्थ्यांनींनी मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्तीसाठी नवीन अर्ज केलेला होता व त्यांना शिष्यवृत्ती मिळालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी फक्त नुतणीकरणाचाच अर्ज करावयाचा आहे.**

**तसेच ज्या विद्यार्थीनींनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित झालेले आहेत व या वर्षात प्रथम अर्ज करणार आहेत अशा विद्यार्थ्यांनी नवीन नोंदणीकरून अर्ज करावयाचा आहे.**

तसेच महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सुचना व वाढीव तारखांबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांनी अथवा पालकांनी पाहणे गरजेचे आहे. तसेच अर्ज भरल्यानंतर वेळोवेळी अर्जाबाबत अल्पसंख्यांक विभागाकडून माहिती अथवा कागदपत्रांची मागणी होत असते. ती पूर्णकरणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शिष्यवृत्ती बाबत नुकसान होवु शकते. अशा प्रकारे होणाऱ्या नुकसाणीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. यांची नोंद घ्यावी आणि अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्यात यावीत. ऑनलाईन अर्जाची प्रिंट व त्यासोबत कागदपत्रे महाविद्यालयात **दिनांक:३०/०९/२०२० पुर्वी जमा करणे आवश्यक आहे.** अर्जाबाबत खालील प्रमाणे अटी आहेत.

१. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.
२. अर्जदार इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसावा.
३. मागील परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण असावेत.
४. पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा २ लाख पेक्षा जास्त नसावी.
५. एका कुटुंबातील दोन अपत्य असणाऱ्यांना ही योजना लागू होईल.
६. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे. (खात्यासोबत आय.एफ.सी. कोड व एम.आय.सी.आर.कोड नंबर देणे आवश्यक आहे) व आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न केले असलेबाबतचा पुरावा म्हणून बँकेकडून आधार संलग्न केलेबाबतची पावती (आधार सिडींगस्लीप) जोडावी.

७. कायम निवासी पत्यासाठी रेशनकार्ड/ वीज बील/ टेलीफोन बील/ मतदान ओळखपत्र या पैकी एक कागदपत्राची आवश्यकता आहे.

८. पालकांचे उत्पन्नाबाबतचे स्वयंघोषित प्रतिज्ञपत्र अथवा मा. तहसीलदार कार्यालयाचा **वर्ष २०१९-२० सालचा उत्पन्नाचा दाखला,** नोकरी करणाऱ्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर विवरण पत्राची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.)

९. दहावी ते मागील वर्षाचे उत्तीर्णपरीक्षेचे गुणपत्रक झेरॉक्स.

१०. वरील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स आवश्यक आहेत.

टीप:- अल्पसंख्याक विभाग व महाविद्यालयाकडून कागदपत्रांची वर्ष भरात कधीही मागणी होवू शकते. त्यामुळे कार्यालयात चौकशी करणे, महाविद्यालयाच्या वेबसाईटवर **(www.mgkanyasangliedu.in)** सुचना पाहणे, काचफलकात नोटीस पाहणे, स्वत: दिलेल्या मोबाईल वरील मेसेज वाचून त्वरीत त्यावर कार्यवाही करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहे. चुकीच्या व वेळाने येणाऱ्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही व त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांना सर्व सुचना महाविद्यालयाच्या (www.mgkanyasangliedu.in) या वेबसाईटवर दिल्या जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाची वेबसाईट पाहणे आवश्यक आहे.

**डॉ. आर. जी. कुलकर्णी**
**प्राचार्य**